
दैनिक
अचूक वेध, अचूक बातमी
# अक्षराज
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
बुलडाणा, सोमवार, दि.१६ जून २०२५

वर्ष : ०४, अंक : ३०५
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.in
Email : newsaksharaj2021@gmail.com




## इंद्रायणी नदीवरील पूल कोसळला, ‘६ जणांचा मृत्यू’ ; २० ते २५ जण वाहून गेले



**अक्षराज : वृत्तसंकलन**
**दि.१५, पुणे :** पुण्याच्या मावळ तालुक्यातून मोठी दुर्घटना घडली आहे. मावळ तालुक्यात तळेगाव दाभाडे शहराजवळील प्रसिद्ध पर्यटनस्थळ असलेल्या कुंडमळा येथे इंद्रायणी नदीवरील जुना पूल कोसळल्याची दुर्घटना घडली आहे. यामुळे मोठी दुर्घटना घडली आहे. जवळपास २५ ते ३० जण या दुर्घटनेत वाहून गेल्याची भीती वर्तवली जात आहे. तर स्थानिक आमदार सुनील शेळके यांनी ६ जणांचा मृत्यू झाल्याची माहिती ‘टीव्ही ९ मराठी’ वृत्तवाहिनीला दिली आहे. त्यामुळे ही घटना खूप मोठी असल्याचं स्पष्ट होत आहे.

इंद्रायणी नदीत वाहून गेलेल्या पर्यटकांच्या बचावासाठी बचाव पथक घटनास्थळी दाखल झालं आहे. पर्यटकांना वाचवण्यासाठी सर्वोतोपरी प्रयत्न केले जात आहे. दुर्घटना घडली तेव्हा तिथे पर्यटकांसोबत लहान मुलंदेखील होती, अशी माहिती आहे. या घटनेमुळे मोठी खळबळ उडाली आहे.

मावळ तालुक्यात गेल्या दोन दिवसांपासून मुसळधार पाऊस सुरु आहे. त्यामुळे नदीच्या पाणी पातळीत वाढ झाली होती. तर दुसरीकडे रविवार असल्याने अनेकजण कुंडमळा येथील पर्यटनस्थळी फिरायला आले होते. याच दरम्यान जुना पूल कोसळल्याची घटना घडली. या दुर्घटनेत २५ ते ३० पर्यटक बुडाल्याची भीती वर्तवली जात आहे. तर स्थानिक आमदार सुनील शेळके यांनी या दुर्घटनेत ६ पर्यटकांचा मृत्यू झाल्याची माहिती एका वृत्तवाहिनीला दिली आहे.

मावळ तालुक्यातील कुंडमाळा हा परिसर प्रसिद्ध पर्यटनस्थळ आहे. त्यामुळे या पर्यटनस्थळावर नेहमी पर्यटकांची गर्दी होत असते. आजदेखील रविवार असल्याने कुंडमाळा परिसरात पर्यटकांची गर्दी होती. पण आज दुपारनंतर इंद्रायणी नदीवरील जुना पूल खाली कोसळला. यावेळी नदीला देखील मोठा प्रवाह होता. त्यामुळे नदीत अनेक जण वाहून गेल्याचा अंदाज आहे.

**सुनील शेळके काय म्हणाले?**
ही घटना दुर्दैवी आहे. तो फॅब्रिकेटेड ब्रिज होता. काही लोकांनी त्यावरुन टू व्हिलर घेऊन जाण्याचा प्रयत्न केला. त्यावेळेस ओव्हरलोड झाल्याने मधला भाग खचला. आतापर्यंत ६ जण दगावल्याची माहिती आमच्यापर्यंत पोहोचली आहे. बचावकार्य सुरु आहे. घटनास्थळी रुग्णवाहिका, एनडीआरएफची टीम आहे. बचावकार्य सुरु आहे, अशी माहिती आमदार सुनील शेळके यांनी दिली आहे.

ब्रिज पडला तिथे काही ठिकाणी सखल भाग आहे तर काही ठिकाणी दगडाचा खडकाळ भाग असल्यामुळे खाली आतमध्ये किती जण अडकले आहेत याची माहिती अद्याप आम्हाला समजू शकलेली नाही, अशी प्रतिक्रिया सुनील शेळके यांनी दिली आहे.

### मृतांच्या नातेवाईकांना ५ लाखांची मदत करणार...
मावळ तालुक्यातील कुंडमळा येथील इंद्रायणी नदीवरील जुना लोखंडी पूल कोसळल्याने मोठी दुर्घटना घडलीये. २५ पेक्षाही अधिक लोक या नदीत पडून वाहून गेली. हेच नाही तर काहीजण पुलाखाली दबली गेली आहेत. पुण्याचे जिल्हाधिकारीही घटनास्थळी पोहोचले असून बचावकार्य सुरू आहे. अडकलेल्या पर्यटकांना बाहेर काढण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. खासदार सुप्रिया सुळे यांनी घटनास्थळी भेट दिली. हेच नाही तर स्थानिक आमदार सुनील शेळके हे घटनास्थळी आहेत. नातेवाईकांनी घटनास्थळी मोठी गर्दी केलीये. ३८ पर्यटकांना सुरक्षित बाहेर काढण्यात आले असून जखमींवर जवळच्या रूग्णालयात उपचार सुरू आहेत.

लोखंडी पुल काढण्यासाठी घटनास्थळी क्रेन देखील आणण्यात आलंय. मंत्री गिरीश महाजन हे घटनास्थळी दाखल झाले असून त्यांनी मृतांच्या नातेवाईकांना ५ लाखांची मदत दिली जाणार असल्याची घोषणा केली. मंत्री गिरीश महाजन म्हणाले की, आतापर्यंत मिळालेल्या माहितीनुसार, २ जणांचा मृत्यू झाला आहे. काहीजण पुलाखाली दाबली गेली आहेत आणि ३५ जणांवर रूग्णालयात उपचार सुरू आहे. काही खासगीमध्ये आहेत तर काही सरकारी रूग्णालयामध्ये आहेत.

पुढे बोलताना गिरीश महाजन म्हणाले, अतिशय दुर्देवी अशी ही घटना आहे. हा पादचाऱ्यांसाठी पूल होता. जूना होता, १९९२ पासून हा पूल होता. परंतू खूप मोठी गर्दी झाली. कारण आज पाऊस पडतोय, यामुळे पर्यटकांची मोठी गर्दी होती. खूप गर्दी पुलावर झाली, लोक उभा होते आणि पूल कोसळला. पोलीस यंत्रणा आहेत, डॉक्टर आहेत. वाहून गेलेली काही लोक आहेत, त्यांचाही शोध सुरू आहे. मला स्थानिक लोकांनी सांगितले की, आज पर्यटकांची खूप मोठी गर्दी होती. लोक आतल्या भागावर येऊन मोठ्या संख्येने उभा राहिले आणि मग तो पूल कोसळला, त्यातून ही घटना घडली. नेमकी किती लोक होती आणि किती वाहून गेली हे नेमकं सांगता येणार नाही. पुढे एक बंधारा आहे तिथे काही लोक सापडतात का? यादरम्यान स्थानिक लोकांनी खूप मदत केली. पूल धोकादायक असल्याची बोर्ड लावल्याचाही दावा गिरीष महाजन यांनी केला आहे.

## अहिल्यानगर जिल्ह्यात खरिपाची १५ टक्के पेरणी
### ४६.३ मिलीमीटर पावसाची नोंद ! वापसा न मिळाल्याने पेरणी रखडली

**अक्षराज : वसंत रांधवण**
**दि.१५, अहिल्यानगर :** यंदा मान्सूनपूर्व पावसाने मे महिन्यात जोरदार हजेरी लावली. जमिनी उफाळून आल्या एवढ्या मोठ्या प्रमाणावर पाऊस झाला होता. त्यानंतर कृषी विभागाने पेरण्याची घाई करू नका, असे आवाहन केले तरी या जिल्ह्यात शेतकर्यांनी १ लाख ५ हजार हेक्टर क्षेत्रावर खरिपाची पेरणी केली आहे. आतापर्यंत १५ टक्के पेरणी झाली असून जून महिन्याच्या १३ दिवसात ४६.३ मिलीमीटर पावसाची नोंद झाली आहे. बहुतांशी ठिकाणी वापसा न मिळाल्याने अद्यापही पेरणी रखडली आहे.

मे महिन्यात झालेल्या पावसामुळे जिल्ह्यात अजूनही खरीप हंगामातील पेरणीच्यादृष्टीने पुर्वमशागतीचे काम सुरू आहे. या मान्सूनपूर्व पावसामुळे अजूनही शेतामध्ये पाणी-पाणी आहे. काही गावांमध्ये माती वाहून गेल्याने शेतकर्यांना पेरणी करणे अवघड झाले आहे.

**पिकनिहाय झालेली पेरणी !**
बाजरी ८ हजार २५१.३० हेक्टर, मका ८ हजार ५४२.४० हेक्टर,तूर १० हजार ७२६, मूग १४ हजार ९६३ हेक्टर, उडिद २५ हजार २१ हेक्टरवर, सोयाबीन १९ हजार ६२७, तर कापूस १२ हजार ९२६ हेक्टर लागवड झाली आहे.



विशेषतः नगर तालुक्यातील दक्षिण भाग, शेवगाव, जामखेड, श्रीगोंदा, पारनेर या भागात अतिवृष्टी व ढगफुटीसदृश्य पाऊस झाल्याने अजूनही जमिनीमध्ये पाणी आहे. त्यामुळे या ठिकाणी पेरण्या लांबल्या आहेत. जिल्ह्यात अद्यापी खरीप हंगामातील काही भागात पेरण्या सुरू झाल्या आहेत. त्यादृष्टीने पूर्वमशागतीचे कामे सुरू आहेत. मान्सून पुर्व पावसामुळे शेतात अजूनही पाणी साचलेले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना पेरणी करणे अवघड झाले आहे. त्यात उत्तर नगर जिल्ह्यातील अकोले, संगमनेर, श्रीरामपूर, कोपरगाव, राहुरी या भागात पेरण्या सुरू झाल्या आहेत. यंदा खरीपासाठी ६ लाख ९३ हजार ३४२.३५ हेक्टर क्षेत्राचे नियोजन करण्यात आले असून आतापर्यंत १ लाख २३९ हेक्टर क्षेत्रात खरीप हंगामातील विविध पिकांची पेरणी झाली आहे. अकोले तालुक्यात रोपवाटीका प्रक्षेत्रावर ४९०.० हेक्टर क्षेत्रावर भात रोप तयार करण्यात आली आहेत. तर यंदा १८ हजार ७४० हेक्टर क्षेत्रावर भाताचे नियोजन केलू असून १.० क्षेत्रावर भाताची लागवड झाली आहे.

## १६ ते २२ जूनपर्यंत पीक कर्ज वाटप सप्ताह... जिल्ह्यात विशेष मेळावे घ्या : जिल्हाधिकारी विनय गौडा

**अक्षराज : वसंत वडस्कर**
**दि.१५, चंद्रपूर :** खरीप हंगामाला सुरुवात झाली असून पीक लागवड, बी-बियाणे व खतांची खरेदी तसेच इतर गरजा पूर्ण करण्यासाठी शेतकऱ्यांना आता पैशांची गरज आहे. हा हंगाम शेतकऱ्यांच्या दृष्टीने अतिशय महत्वाचा असल्याने आणि जिल्ह्यातील कोणताही शेतकरी पीक कर्जापासून वंचित राहू नये, म्हणून जिल्ह्यात १६ ते २२ जून या कालावधीत पीक कर्ज वाटप सप्ताह आयोजित तरण्यात येणार आहे. यासाठी जिल्हाभर विशेष मेळावे घेऊन शेतकऱ्यांना पीक कर्जाचे वाटप करावे, असे आदेश जिल्हाधिकारी विनय गौडा जी. सी. यांनी निर्गमित केले आहे.

पीक कर्ज योजना शेतकऱ्यांसाठी एक महत्वाची योजना आहे. या योजनेद्वारे शेतकऱ्यांना शेती खर्च, पीक लागवड, तसेच इतर गरजा पूर्ण करण्यासाठी आर्थिक सहाय्य मिळते. चंद्रपूर जिल्ह्यात पाक कर्ज वाटपाला गती मिळावी, कोणताही शेतकरी वंचित राहू नये, या उद्देशाने खरीप हंगाम - २०२५ करीता शेतकऱ्यांना बँका आणि संलग्न विभागाच्या समन्वयाने पीक कर्ज वाटप करण्यासाठी जिल्हाधिकारी गौडा यांच्या संकल्पनेतून १६ ते २२ जून या कालावधीत विशेष मोहीम हाती घेण्यात आली आहे.

या अंतर्गत जिल्ह्यातील प्रत्येक बँक शाखेत सर्व तहसीलदार, गट विकास अधिकारी, तालुका कृषी अधिकारी, बँकेचे शाखा व्यवस्थापक, सहायक निबंधक, जिल्हा उपनिबंधक (सहकारी संस्था), तालुका पशुसंवर्धन अधिकारी, सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय आदींनी अचूक व परिणामकारक नियोजन करावे. तसेच प्रत्येक बँकेच्या शाखेत १६ जून ते २२ जून या सप्ताहात दररोज सकाळी ११ ते सायंकाळी ४ या वेळेत कर्ज वाटप मेळावे आयोजित करावे, असे आदेश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले आहेत. या कॅम्पचे पर्यवेक्षण करण्याकरीता तहसीलदारांनी तालुक्यातील महसूल, कृषी ग्राम विकास आणि सहकार विभागाच्या क्षेत्रीय अधिकारी/ कर्मचाऱ्यांची नोडल अधिकारी म्हणून नेमणूक करावी. नोडल अधिकाऱ्यांनी सप्ताहाच्या कालावधीत दररोज किमान ३ तास नेमून दिलेल्या बँक शाळेला भेट द्यावी. पीक कर्ज वाटपाच्या मेळाव्यात सहभागी होऊन १०० टक्के शेतकऱ्यांना कर्जाचे वाटप होईल, असे पाहावे. तसेच कोणताही पात्र शेतकरी पीक कर्जापासून वंचित राहणार नाही याची दक्षता घ्यावी.

## थोडक्यात

### गुहागर आगारचा ढिसाळ कारभार !
#### गुहागर- मुंबई एसटी बस तब्बल ५ तास उशिरा



अक्षराज : उदय दणदणे
दि.१५, गुहागर : गुहागर आगारातून लांब पल्ल्यासाहित ग्रामीण एसटी सेवेचा वेळापत्रक कोलमडून गेल्याचे दिवसांदिवस समोर येत असून गुहागर डेपोच्या ढिसाळ कारभाराला अक्षरशः येथील प्रवाशी जनता वैतागली आहे. रविवार दिनांक १५ जून २०२५ रोजी सकाळी ७.३० वाजता सुटणारी गुहागर आगाराची गुहागर -मुंबई गाडी दुपारी १२.१० वा. गुहागर आगारातून सोडण्यात आली. तब्बल पाच तास एस.टी. उशिराने सोडल्याने प्रवाशांकडून संताप व्यक्त करण्यात येत आहे. भर पावसामध्ये सकाळी साडेसात वाजल्यापासून प्रवासी एस.टी. स्टॉप वर एस.टी.ची वाट पाहत ताटकळत उभे होते.अनेक प्रवाशांनी पत्रकारांजवळ तक्रार केल्यानंतर पत्रकारांनी एसटी रत्नागिरीचे विभाग नियंत्रक बोरसे यांना याबाबत माहिती दिल्यानंतर अर्ध्या तासानंतर एस.टी. सोडण्यात आली.

गुहागर एसटी आगारचा भोंगळ कारभार सातत्याने समोर येत असून लांब पल्ल्याच्या गाड्यांवरती असणारे काही चालक तर एस. टी. स्टॉपवर एस.टी.न थांबवताच सुसाट नेत असल्याचे प्रकार घडत आहेत. गुहागर आगार प्रमुख यांच्याकडे तक्रारी करून सुद्धा कोणत्याही प्रकारची सुधारणा दिसून येत नाही. त्याचा प्रत्यय रविवारी अनेक प्रवाशांना आला. गुहागर आगारातून सकाळी सुटणारी गुहागर -मुंबई ही लांब पल्ल्याची एस.टी. तब्बल पाच तास उशिरा सोडण्यात आल्याने मुंबईकडे प्रवास करणाऱ्या प्रवाशांना नाहक मनस्ताप सहन करावा लागला. सध्या गुहागर आगारामध्ये एस.टी.चे वेळापत्रकच बिघडलेले दिसत आहे. गुहागर तालुक्यात कार्यरत असलेली गुहागर तालुका प्रवासी संघटना चांगलं उत्तम काम करत असून अनेक वेळा प्रवाशांच्या न्याय हक्कासाठी लढा देत आहे. प्रवाशांच्या अनेक होणाऱ्या गैरसोयी बाबत गुहागर एस. टी. डेपोच्या अधिकाऱ्यांशी तसेच परिवहन मंत्री यांच्याकडे चर्चा करत आहे, परंतु गुहागर आगार प्रशासनात सुधारणा दिसून येत नाही. याबाबत वरिष्ठ अधिकारी तसेच लोकप्रतिनिधी यांनी याबाबत योग्य ती सूचना द्यावी अशी मागणी प्रवाशी वर्गाकडून केली जात आहे.

### बुलडाण्यात मायलेकीचा करुण अंत



**अक्षराज : प्रतिनिधी**
**दि.१५, बुलडाणा :** बुलडाण्यात एक दुख:द घटना घडली आहे. ज्यात मायलेकीचा करुण अंत या घटनेत झाला. त्यामुळे जामोदे कुटुंबियांवर शोककळा पसरली आहे. बुलडाणा जिल्ह्यातील खामगाव शहरातील सुटाळपुरा भागातील जामोदे परिवारातील माय लेकीवर काळाने घाला घातला. देवदर्शनासाठी मलकापूर तालुक्यातील निंबा देवी येथे गेलेल्या मायलेकीचा विश्वगंगा नदीमध्ये बुडून दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना रविवार १५ जून रोजी सकाळी घडली. स्थानिक सुटाळपुरा भागातील गढीजवळ राहणारे मयूर जामोदे हे त्यांची पत्नी पुनम मयूर जामोदे वय वर्ष ३२ व चिमुकली आर्वी जामोदे वय वर्ष ५ यांच्यासह आज १५ जून रोजी सकाळी मलकापूर तालुक्यातील निंबा देवी संस्थान येथे देवीच्या दर्शनासाठी गेले होते. या ठिकाणी विश्वगंगा नदी पात्राजवळ पुनम जामोदे आणि चिमुकले आर्वी हे दोघे पाय धुण्यासाठी गेले असता पाण्यात खेळताना चिमुकली आर्वी हिचा पाय खोलात गेला आणि ती पाण्यात बुडाली मुलीला वाचविण्यासाठी आई पूनम हिने सुद्धा पाण्यात उडी घेतली असता ती सुद्धा पाण्यामध्ये वाहून गेली. बघता बघता दोघी मायलेकी पाण्यामध्ये बुडाल्या. यावेळी वडील मयूर जामोदे आणि त्या नदी पात्राजवळ उपस्थित असलेल्या नागरिकांनी त्या दोघांना वाचवण्याचा आटोकाट प्रयत्न केला मात्र त्यावेळी ते दोघेही खोल पाण्यात बुडाले होते.

या घटनेची माहिती मिळताच मलकापूर येथील ग्रामीण पोलीस स्टेशनचे अधिकारी कर्मचारी तसेच शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली. तसेच बचाव कार्य सुद्धा केले परंतु त्यांना यश आले नाही. या दुर्दैवी घटनेमुळे खामगाव शहरातील सुटाळपुरा भागांमध्ये नागरिकांकडून एकच हळहळ व्यक्त केली जात आहे. मयूर जामोदे वय वर्ष,२५ राधा जामोदे आणि संध्या सागर जामोदे यांच्यावर मलकापूर सामान्य रुग्णालयात उपचार सुरु आहेत.

### पतीची हत्या करून बॉडी घरातच पुरली...

**अक्षराज : प्रतिनिधी**
**दि.१५, नाशिक :** नाशिकमध्ये एका धक्कादायक घटनेने खळबळ उडाली आहे. सुरगाणा तालुक्यातील मालगोंदा येथे एका पत्नीने आपल्या पतीची कुऱ्हाडीने वार करून हत्या केली. इतकेच नाही, तर तिने त्याचे तुकडे करून ते घरातच पुरले. ही घटना उघडकीस आल्याने परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे. इंदोरच्या राजा रघुवंशी हत्या प्रकरणाची घटना ताजी असतानाच, ही घटना समोर आली आहे. यशवंत मोहन ठाकरे असे हत्या झालेल्या व्यक्तीचे नाव आहे. ते सुरगाणा तालुक्यातील मालगोंदा येथील रहिवासी होते. त्यांच्या पत्नीनेच त्यांची हत्या केली. आपला मुलगा दोन महिन्यांपासून गुजरातमध्ये मजुरीसाठी गेला. तो अजूनही परत न आल्याने यशवंतच्या आई-वडिलांनी सुनेकडे विचारणा केली. मात्र, तिने उडवाउडवीची उत्तरे दिली. दरम्यान, सून स्वतः गुजरातच्या बिलीमोरा येथे निघून गेली. त्यामुळे घरच्यांना संशय आला. यशवंत परत न आल्याने त्यांनी अधिक चौकशी करण्याचा प्रयत्न केला. पण काहीच पत्ता लागला नाही. अखेर, यशवंतच्या भावाची पत्नी प्रभाला भेटायला आली. त्यावेळी तिला काहीतरी संशयास्पद वाटले. तिने ही गोष्ट आपल्या नवऱ्याला सांगितली. त्यानंतर हे प्रकरण उघडकीस आले.

## संपादकीय



### एचटीबीटी कापूस बियाण्यांवरील बंदी

भारत हा जगात दुसऱ्या क्रमांकाचा कापूस उत्पादक देश आहे. आपल्या पुढे फक्त चीन आहे. यावर्षी आपले कापसाचे उत्पादन होते ५८.४ लाख टन. जगाच्या तुलनेत हा वाटा तब्बल एक चतुर्थांश आहे. देशात सव्वा कोटी हेक्टरवर कापसाची लागवड होते. त्यातील ४२ लाखांहून अधिक हेक्टर क्षेत्र महाराष्ट्रात आहे. या वैभवी वर्तमानाला नख लागले आहे. राज्यातील कापूस उत्पादक शेतकरी आत्महत्येच्या वणव्यात होरपळतो आहे. कधीकाळी ढाक्याच्या मलमलीसाठी विदर्भातून कापूस जायचा, अशा लोककथा चर्चेत होत्या. सध्या त्याच पट्ट्यात प्रतिबंधित हर्बिसाइड टॉलरेंट बीटी (एचटीबीटी) कापूस बियाण्यांनी धुडगूस घातला आहे. दलालांच्या टोळ्यांना शेतकरी शरण गेले आहेत. सरकार असहाय्य अवस्थेत आहे.

मागील वर्षी २५ टक्के लागवड झालेल्या या बियाण्यांचा यंदाचा वाटा ४० टक्क्यांपेक्षा वाढेल. जैवविविधता धोक्यात येण्याच्या शक्यतेने काही पर्यावरणवादी सर्वोच्च न्यायालयाची पायरी चढले. या बियाण्यांवर बंदी आली. आंध्र आणि तेलंगणपेक्षाही गुजरातेतून एचटीबीटीची रसद खुलेआम महाराष्ट्रात पोहचते. यातील गुप्त यंत्रणा थक्क करते. 'ना खाता, ना वही' पद्धतीची बिनबोभाट किमया म्हणजे एचटीबीटी व्यवहार. तसे म्हटले तर या वादाला दोन बाजू आहेत. एचटीबीटीबद्दलच्या नियमबाह्य प्रीतीत लाभाचा वाटा मोठा आहे. हे बियाणे तणनाशक असल्याने लागवडीचा खर्च घटतो. उत्पादन वाढते. एचटीबीटी बियाण्यांमुळे बोंडअळीचा प्रादुर्भाव टळतो असे म्हणतात. नेमका हा मोह शेतकऱ्यांना सोडवत नाही. जुने तुणतुणे सोडा आणि एचटीबीटीची वाट मोकळी करा, ही मागणी चक्क शेतकरी संघटनेने केली आहे. आंतरराष्ट्रीय बाजारात बोलगार्ड-४ तंत्रज्ञान २०१७पासून उपयोगात आहे. आपल्याकडे अद्याप बोलगार्ड-३लाच मुभा नाही.

एका तथ्याकडे गांभीर्याने लक्ष द्यायला हवे. जगातील कोणत्याही उत्पादकाला उत्पादन खर्चाच्या आधारावर मालाचा भाव ठरविण्याचा अधिकार आहे. अपवाद आहे तो फक्त शेतकरी. त्याच्या मालाचे भाव ठरवितात ते सरकार आणि व्यापारी. आता त्याला कुठले बियाणे पेरावे याचेही स्वातंत्र्य उरणार नसेल, तर त्याची मानसिक कोंडी समजून घ्यायला हवी. एचटीबीटीमुळे पर्यावरणावर, उत्पादनक्षमतेवर नकारात्मक परिणाम होतो. पारंपरिक बियाण्यांच्या जाती नष्ट होतात. पर्यावरण मंत्रालयाच्या अंतर्गत काम करणाऱ्या अनुवांशिक अभियांत्रिकी मूल्यांकन समितीचे (जीईएसी) या बियाण्याला समर्थन नाही, अशी उत्तरे शेतकऱ्याला दिली जातात. नव्या तंत्रज्ञानाला आपलेसे करण्यात सर्वांचे हित असल्याची शेतकऱ्यांचीही भावना आहे. अत्याधुनिक तंत्रज्ञानानुसार कपाशीत तण आणि अळीचा प्रादुर्भाव होत नाही. तसे झाले तर कीटकनाशके निर्माण करणाऱ्या कंपन्यांचा ताळेबंद विस्कटतो. कीडच लागणार नसेल तर, त्यांचे उत्पादन चालणार कसे? भावनांपेक्षा व्यवहार वरचढ ठरला तर, कृषिप्रधान देश वगैरे संकल्पना कशा धराशायी होतात त्याचे हे बोलके उदाहरण आहे. परवा यवतमाळ जिल्ह्यात चक्क पोलिस पाटलाने एचटीबीटीची पाकिटे घरी दडवली होती. त्याच्या अटकेने सखोल जाळे उलगडले. केंद्र आणि राज्याचा यावर पारदर्शी समन्वय हवा. गांभीर्य हवे. ठाम नियंत्रणदेखील. तसाही पीओपीवरील बंदीचा राज्यात झिम्मा सुरू आहे. प्लास्टिक बंदीचाही शिरस्ता तोच राहिला. पाच लाख रुपये दंड आणि पाच वर्षे सक्तमजुरीची शिक्षा असतानाही अवैध प्लास्टिकचा संचार आहेच. ढिसाळ कारवाईचे अपघात पचवत 'बंदीग्रस्तां'ची लोकल सरकते आहे. प्रतिबंधित 'सीमी'च्या वऱ्हाडातील कारवाया अनेक वर्षे थांबल्या नव्हत्या. अकोल्यातून आठ कार्यकर्त्यांच्या मुसक्या आवळल्यावर यंत्रणा भानावर आली होती. 'सीमी'ची ही अवस्था आहे, तिथे बंदीचा कापूस उडाला तर लक्ष देणार कोण?

# चिंताजनक विमान दुर्घटना



सरदार वल्लभभाई पटेल आंतरराष्ट्रीय विमानतळावरून लंडनच्या दिशेने निघालेले बोईंग ७८७ - ८ हे विमान उड्डाणानंतर अवघ्या ३१ सेकंदात मेघानीनगर येथील नागरी वस्तीत कोसळल्याने झालेल्या भीषण अपघातात गुजरातचे माजी मुख्यमंत्री विजय रूपाणी यांच्यासह २७५ जणांचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना गुरुवारी घडली. या भीषण अपघाताने सर्वांचेच मन हेलावले. हे विमान बी जे मेडिकल कॉलेजच्या हॉस्टेलवर कोसळल्याने त्या हॉटेलमधील ३४ विद्यार्थ्यांचाही दुर्दैवी अंत झाला. या दुर्घटनेनंतर संपूर्ण जगभर हळहळ व्यक्त होत आहे. अर्थात विमान दुर्घटना घडून त्यात निष्पाप प्रवाशांचा बळी गेल्याची ही पहिली घटना नाही याआधीही अशा अनेक दुर्घटना घडल्या आहेत आणि त्यात अनेक प्रवाशांचा जीव गेला आहे. गेल्याच वर्षी दक्षिण कोरियामध्ये जेजू एअरचे बँकॉक ते मुआन या मार्गावरचे विमान मुआन विमानतळावर उतरताना भीषण अपघात झाला. या अपघातात विमान भस्मसात होऊन १७९ प्रवाशी दगावले होते. २०२३ साली ऐन संक्रातीच्या दिवशी नेपाळमध्ये एक मोठी दुर्घटना घडली होती. नेपाळमधील प्रमुख शहरांपैकी एक असलेल्या पोखर या शहराजवळ एक प्रवाशी विमान कोसळून झालेल्या अपघातात ६० हुन अधिक प्रवाशांचा दुःखद अंत झाला होता. अहमदाबाद येथे झालेला विमान अपघात हा विमानात तांत्रिक बिघाड झाल्याने झाल्याचे सांगण्यात आले आहे. विमानाचा ब्लॅक बॉक्स मिळाला पण अपघाताचे कारण अद्यापही समजू शकले नाही. सरकारने या विमान अपघाताची चौकशी करण्यासाठी चौकशी आयोग नेमला आहे. हा चौकशी आयोग या अपघाताची सखोल चौकशी करील त्यामुळे लवकरच या अपघाताचे खरे कारण समोर येईल. बहुतेक विमान अपघात हे खराब हवामानामुळेच झाल्याचे सांगण्यात येते. खरे तर उड्डाणापूर्वी प्रत्येक वैमानिकाला हवामानाचा अंदाज सांगितला जातो. या आधारावर तो आपली रणनीती ठरवतो. या विमानाचे सारथ्य करणारे वैमानिक आणि सहवैमानिक दोघेही अनुभवी होते. त्यामुळे त्यांच्याकडून चूक झाली असावी असे वाटत नाही अर्थात विमान अपघातात केवळ वैमानिकाचीच चूक असते असे नाही. पक्षी विमानाला धडकून अपघात झाल्याच्याही अनेक घटना घडल्या आहे. ऐनवेळी इंजिनमध्ये बिघाड झाल्याने अपघात होतात. वातावरणात बदल झाल्यानेही अपघात होतात. वातावरणाची दृश्यमानता अचानक कमी होऊन अपघात घडल्याच्याही घटना घडल्या आहेत. वातावरणाची दृष्यमानता कमी असेल तर वैमानिक उड्डाण करत नाहीत. अर्थात पर्वतीय भागात दृष्यमानता कमी असतेच. डोंगराची कमी, जास्त उंची असल्याने आणि सतत बदलणारे हवामान, धुके यामुळे अपघात होण्याची शक्यता असते मात्र अलीकडे अद्ययावत संगणक प्रणाली असल्याने विमान किती उंचावरून जात आहे. हवामानात काय बदल घडत आहे याचा अंदाज वैमानिकांना येतच असतो तरीही काही वैमानिक अतिआत्मविश्वासाने विमान उड्डाण करतात. हवामानाची पर्वा न करता स्वतःसह प्रवाशांचा जीव धोक्यात घालतात. तांत्रिक कारण, खराब हवामान, पक्षाची धडक कारण काहीही असले तरी विमान अपघातात ज्या प्रवाशांचा जीव जातो तो मात्र परत येत नाही. अलीकडे विमान अपघातांचे प्रमाण खूप वाढले आहे. १९७० पासून आजवर ११ हजारांहून अधिक लहानमोठे विमान अपघात झाले असून त्यात ८३ हजारांहून अधिक प्रवाशी मृत्युमुखी पडले आहेत. हा आकडा चिंताजनक आहे. भारततही अलीकडे विमानात बिघाड झाल्याच्या अनेक घटना घडल्या आहेत. मागील वर्षी दिल्लीवरून बंगळुरुला जाणाऱ्या विमानाचे इमर्जन्सी लँडिंग करावे लागले होते. वैमानिकाने यशस्वी लँडिंग केल्याने अपघात टळला होता. विमान उड्डाण करत असताना विमानातून ठिणग्या उडत असल्याचे वैमानिकाच्या लक्षात आल्याने विमानाचे इमर्जन्सी लँडिंग करावे लागले. प्रवाशांचे नशीब बलवत्तर होते म्हणून त्यावेळी अपघात टळला आणि शेकडो प्रवाशांचा जीव वाचला होता. त्या प्रवाशांचे नशीब बलवत्तर होते म्हणून त्या विमानाचा अपघात झाला नाही मात्र आपल्या देशात विमान अपघातात अनेक लोकांना जीव गमावावा लागला आहे. त्यात अनेक राजकीय आणि महनीय व्यक्तींचा समावेश आहे. काँग्रेस नेते संजय गांधी, माजी केंद्रीय मंत्री माधवराव सिंधिया, लोकसभेचे तत्कालीन अध्यक्ष आणि तेलगु देसमचे नेते जी एम सी बालयोगी, मेघालयाचे ग्रामीण विकास मंत्री सायप्रियम संगमा, हरियाणाचे ज्येष्ठ नेते ओमप्रकाश जिंदाल, अरुणाचल प्रदेशचे मुख्यमंत्री दोरजी खांडू, आंध्रप्रदेशचे मुख्यमंत्री वाय एस राजशेखर रेड्डी हे त्यातील काही महत्वाची नावे आहेत. त्यात आता विजय रूपाणी यांच्या नावाचीही भर पडली आहे. तीन वर्षापूर्वी भारताचे पहिले चीफ ऑफ डिफेन्स स्टाफ ( सिडीएस ) जनरल बिपीन रावत यांचे एका हेलिकॉप्टर अपघातात निधन झाले होते. विमान अपघातात अशा मोठ्या व्यक्तींचे निधन होणे ही देशाची मोठी हानी आहे. केवळ मोठे सिलिब्रेटीच नव्हे तर सर्वसामान्य प्रवाशांचा जीव देखील तितकाच महत्वाचा आहे. सर्वसामान्य मध्यमवर्गीय नागरिकांसाठी तर विमान प्रवास हे स्वप्न असते आणि जर असे अपघात झाले तर त्या स्वप्नांचीच नव्हे तर त्याच्या संपूर्ण कुटुंबाचीच राखरांगोळी होते त्यामुळे असे अपघात होणार नाही याची काळजी संबंधित यंत्रणेने घ्यायला हवी.

**- श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

# नमुंमपा सार्वजनिक रुग्णालय, वाशी येथे जागतिक रक्तदाता दिन साजरा

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.१४, वाशी (नवी मुंबई) :** ए,बी,ओ. रक्तगटाचा जनक, कार्ल लँडस्टेनर यांचा जन्म दिवस १४ जून हा 'वर्ल्ड ब्लड डोनर डे' म्हणून साजरा केला जातो. त्या अनुषंगाने नवी मुंबई महानगरपालिका सार्वजनिक रुग्णालय, वाशी येथे 'जागतिक रक्तदाता दिन' मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.




नवी मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या निर्देशानुसार, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. प्रशांत जवादे यांच्या मार्गदर्शनाखाली, वैद्यकीय अधीक्षक डॉ. राजेश म्हात्रे यांच्या पुढाकाराने, डॉ. प्रकाश राठोड (डीएमओ), डॉ. प्रीती संगानी (बीटीओ), डॉ. प्रियंका शेठ (बीटीओ), सुभाष खटके (टेक्निशियन), सरिता खेरवसिया (एमएसडब्ल्यू), डॉ. राजेश ओतुरकर यांच्यासह डॉक्टर्स, नर्सेस, कर्मचारी यांनी मिळून सदर कार्यक्रम मोठ्या उत्साहात साजरा केला गेला.

**Give blood, Give hope :**
**Together we save lives.**
**रक्त द्या, आशा द्या :**
**एकत्रपणे आपण जीव वाचवूया.**

अशा प्रकारची यावर्षीची थीम असून त्या थीमवर आधारित रांगोळी काढण्यात आली होती. तसेच रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले होते. रक्तदात्यांचे स्वागत करून त्यांना झाडाचे रोप देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला.सदर कार्यक्रमाद्वारे जास्तीत जास्त लोकांनी स्वेच्छेने रक्तदान करावे असे आवाहन करण्यात आले.

यावेळी रुग्णालय कर्मचाऱ्यांसमवेत उपस्थित रक्तदाता वर्ग, पेशंट तसेच नागरिक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

## सांत्वन गर्दीत...

आपत्तीग्रस्त सांत्वना
उसळली अलोट गर्दी
जणूं चालला सोहळा
अनोळखी असे अर्धी

सोडू नका महाप्रयासे
लाभली रे सुवर्णसंधी
प्रसिद्धीझोतात रहावे
वेळसाधू करावीचांदी

सजून बसली मिडिया
अपडेट करतात यादी
स्पर्धा आसवे पुसण्या
कोण नेते आले आधी

डोळे दाखवे पाणावले
उमाळा उसळे कागदी
प्रत्येक स्वार्थी विभीन्न
टीआरपी वसूल नगदी

मदत मिळव सरकारी
वळवावा इकडे निधी
घ्यावे आपण ओसंडून
दुथडी भरून वाहे नदी

कनवाळू किती साहेब
जनसमुदाय लागेनादी
सुप्तहेतू आपलासाधी
अंतिमता मिळवू गादी

**- हेमंत मुसरीफ, पुणे**
**९७३०३०६९९६**

अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी

# अन्नाचे महत्व सांगणारी बाबांची आठवण

साधारण मी वर्ग चौथीमध्ये शिकत असेल तेव्हाचा हा प्रसंग. कुटुंबातील आम्ही सर्वजण संध्याकाळी एकत्र जेवायला बसायचो. सकाळचे जेवण सहसा सगळ्यांचे सोबत नसायचे कारण,आम्ही भावंडे शाळेत जायचो.आई घरातील दैनंदिन कामे आवरून शेतकामासाठी जायची तर, बाबा नोकरीनिमित्त कामावर निघून जायचे. जेवणाच्या वेळी आई-बाबांच्या शेजारीच मी जेवायला बसायचो. आईने जेवायला वाढले की, जेवायला सुरुवात करायचो. सकाळपासूनच्या घडलेल्या गोष्टींवर आम्ही सर्वजण गप्पा मारायचो. आनंदाने जेवण करायचो. आई शेती विषयी, अण्णा त्यांच्या नोकरी विषयी व त्यांच्या संपर्कात आलेल्या लोकांविषयी तर आम्ही भावंडे शाळेत घडलेल्या गप्पां सांगायचो.

जेवतांना मज्जा यायची.असंच एकदा, मी जेवायला बसल्यानंतर आईने ताटामध्ये नेहमीप्रमाणे वाढले मात्र, मी त्या दिवशी काही चुटूर-बुटूर खाल्ल्यामुळे मला फारशी भूक नव्हती.थोडेफार जेवण केल्यानंतर माझे पोट भरल्यासारखे वाटत असल्यामुळे माझ्या जेवत्या ताटामध्ये काही भाजी व पोळी शिल्लक राहिली. आईला इशारा करून आईला म्हटले, आई, माझं जेवण झालं अगंव मी तसाच ताटामध्ये हात धुणार, तेवढ्यात माझ्या शेजारी बसलेल्या बाबांचं लक्ष माझ्याकडे गेलं व बाबा म्हणाले, थांब! ताटात असे उष्ट अन्न ठेवू नये. मी थांबलो. बाबा मला समजावत होते.



बाबांनी अगदी शांतपणे विचारले,आपल्या ताटातील ही भाजी आणि पोळी कशी तयार होते? माहितीये का तुला? मी ओशाळलेल्या नजरेने बाबाकडे बघुन म्हणालो, माझ्या आईने बनवली. त्यावर बाबा बोलले, यासाठी तुझ्या आईची मेहनत तर आहेच. तुझी आई गरमीमध्ये चुलीजवळ बसून,चुलीतील काड्यांचा धूर,चटके सहन करून हे अन्न आपल्याला जेवायला घालते, यात तिची महत्त्वाची भूमिका आहेच मात्र, त्याबरोबर आपल्या शेतकरी राजांची ही महत्त्वाची भूमिका आहे. बाबा शांतपणे समजावून सांगत होते. ही भाजी, भाकर, पोळी आपल्या ताटामध्ये येण्याआधी तिला अनेक कष्टाच्या प्रवासातून यावं लागतं. बाळ लक्षात घे! हे अन्न कितीतरी कामगारांच्या मेहनती तून व घामातून तयार होतं. मी अगदी लक्ष देऊन,त्यांचे अन्नाविषयीचे महत्व ऐकून त्यांच्या सांगण्याला प्रतिसाद देत होतो.

शेतकरी भर उन्हात शेतामध्ये राबतो. कष्ट करतो. मशागत करून,पावसाची वाट पाहतो. पाऊस पडला कि, शेतामध्ये गहू, ज्वारी, बाजरी असं हे धान्याचा एक-एक दाणा शेतात पेरतो. त्याची लहान मुलांप्रमाणे काळजी घेतो. त्यांना खत, पाणी देऊन वाढवतो. जवळपास तीन ते चार महिन्यापर्यंत त्यांना अनेक गोष्टींचा सामना करावा लागतो.कधी अवकाळी पावसाच्या तडाख्यातून तर कधी दुष्काळजन्य परिस्थितीत पीक कसं वाचेल असा, पराकोटीचा प्रयत्न करतो.शेवटी,आलेले पिक हाती येण्यासाठी त्याला कापणी करून,मळणी यंत्रातून काढतो. ह्या धान्याचे पोते भरून बाजारामध्ये विकायला ठेवतो. आपण पैशाच्या रूपाने त्याचे मूल्य ठरवून ते विकत घेतो. त्यानंतरही आपल्या घरी आल्यानंतर तुझी आई त्यातील काडी, कचरा,बारीक मातीचे खडे, गोटे बाहेर काढून, सुपाने पाखडून स्वच्छ बनवते. हे गहू, ज्वारी पीठ गिरणीतून दळून आणते.हे सर्व ऐकतांना माझा चेहरा गंभीर झाला व हलकीशी नजर आईकडे वळली.आईच्या चेहऱ्यावरील सुखद भाव बघून अन्नाचे महत्त्व लक्षात आले. बाबा समजावत होते. दळल्यानंतर आई चुली जवळ बसून, चटके सहन करून आपल्यासाठी हे जेवण बनवते त्यातही तिचे कष्ट आहेतच..!

बाबांनी अन्नाचे महत्व समजावल्यानंतर,आपल्या ताटातील अन्न हे एवढ्या कष्ट व मेहनतीच्या प्रवासातून आपल्यापर्यंत पोहोचते,याची पूर्ण कल्पना आली. तेव्हा शाळेतील मराठी विषयातील,कवयित्री बहिणाबाईंची कविता आठवली. अरे संसार संसार,जसा तवा चुल्यावर । आधी हाताला चटके,मग मिळते भाकर त्यानंतर मी कधीच ताटामध्ये अन्न उष्ट पडू दिले नाही. ताटातील अन्नाचा एक एक कण उचलून खाल्ला. बाबांची ही शिकवण आयुष्यभरासाठी कायम मनात करून ठेवलीली. धन्यवाद बाबा! सर्वांना फादरर्स डे शुभेच्छा...!

**श्री.विनोद शेनफड जाधव**
**मासरूळ, जि.बुलडाणा**
**मो.९७६३२८२८७७**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायलयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# कुंडमळा येथे इंद्रायणी नदीवरील पूल कोसळलेल्या ठिकाणी आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन यांनी सायंकाळी भेट दिली. ही दुर्घटना दुर्दैवी आहे. दरम्यान, बेपत्ता झालेल्या पर्यटकांचा शोध घेताना व बचावकार्य करताना टीम...



# थोडक्यात

## महामार्ग सुधारणा न झाल्यास आंदोलन करू - डॉ.शिंदे



**अक्षराज : बाळू धायगुडे**

**दि.१५, खंडाळा (सातारा) :** राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ९६५ डी. हा खंडाळा तालुक्यातील शिरवळ, पिसाळवाडी, भोळी, लोणी, तोंडल, भादे या गावांच्या हद्दीतून जात असून या महामार्गावर अनेक ठिकाणी स्पीड ब्रेकर, रिफ्लेक्टर्स, वाहतूक चिन्हे, पाऊसपाणी व्यवस्थापन या बाबतीत त्रुटी आहेत. यामुळे या ठिकाणी अनेकवेळा अपघात घडून येत आहेत. यामध्ये मोठ्या प्रमाणात जिवीतहानी होत आहे.तसेच वाहनांचे नुकसान ही मोठ्या प्रमाणात होत आहे. यासंदर्भात पिसाळवाडी, भोळी, लोणी, तोंडल, भादे या ग्रामपंचायतीने शिरवळ पोलीस निरीक्षक यशवंत नलावडे यांना याबाबत पत्रे दिली असता त्यांनी तात्काळ एन.एच.आय. चे अँथॉरीटी इंजिनिअर फुटाणे यांचे बरोबरीने स्थळ पाहणी करून बैठक आयोजित केली.

या बैठकीत खंडाळा तालुका विकास प्रतिष्ठानचे सचिव डॉ.विजय शिंदे यांनी या गावातील ग्रामस्थांच्या अडचणी सांगून यावर एन.एच. ए.आय ने वेळेत उपाययोजना न केल्यास आगामी काळात यासाठी आंदोलन उभे केले जाईल व त्याची सर्वस्वी जबाबदारी एन.एच.ए.आय.ची राहील असे सांगितले. उद्योजक प्रमोद चव्हाण यानी परिसरात औद्योगिकीकरण झपाट्याने वाढत आहे. यामुळे वाहतूक वाढत आहे. यामुळेच ग्रामस्थ व कामगार यांची सुरक्षा महत्वाची आहे असे सांगितले. शिरवळ पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक यशवंत नलावडे यांनी एन एच ए.आय शी यासाठी पत्रव्यवहार करू असे सांगितले. अजिंक्य चव्हाण यांनी यासाठी विशेष परिश्रम घेतले. यावेळी सोमनाथ चव्हाण, सदाशिव चव्हाण, सागर पिसाळ, गणेश भोसले, अविनाश चव्हाण, मानसिंग चव्हाण, पोलीस पाटील अजित चौधरी व ग्रामस्थ उपस्थित होते.

## आदिवासी वनहक्क दावे त्वरित निकाली काढा - श्रीराम सातपुते

**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.१५, नागपूर :** विदर्भातील नागपूर आणि अमरावती विभागात असंख्य आदिवासी वनहक्क दावे प्रलंबित असून नागपूर विभागीय आयुक्त यांनी मार्च मध्ये काही दावे निकाली काढले. परंतु अमरावती विभागातील वनहक्क दाव्याचे अर्ज गेल्या पाच वर्षापासून कार्यालयात धूळ खात पडले आहे. ते वन हक्क दावे त्वरित निकाली काढावे. याकरिता सामाजिक कार्यकर्ते व ग्राहक पंचायत महाराष्ट्राचे नागपूर जिल्हा ग्रामीण संघटक श्रीराम सातपुते यांनी निवेदनाद्वारे दावे निकाली काढण्याची मागणी केली आहे.

सन २००५ च्या अगोदर ज्या अनुसूचित जमातीच्या व इतर पारंपारिक वननिवासी (वन हक्काची मान्यता) दावेदाराचा जंगलात वनहक्क जमिनीवर ताबा होता त्यांनी आदिवासी वनहक्क अधिनियम २००६, नियम २००८ व सुधारित नियम २०१२ मधील कलम ६ पोटकलम चार आणि नियम १५(१) अन्वेय जिल्हास्तरीय वनहक्क समितीकडे २०१९ मध्ये पाठवले होते. जिल्हास्तरीय वनहक्क समितीने इतर पारंपारिक वनहक्क दावे नामंजूर केले. त्यामुळे अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वननिवासी यांनी विभागीय आयुक्त अमरावती यांच्याकडे २०२० मध्ये अपील दाखल केले होते. परंतु गेल्या ५ वर्षापासून विभागीय आयुक्त अमरावती यांनी वनहक्क दाव्याकडे दुर्लक्ष केल्यामुळे हे दावे धुळखात पडले आहे. वनहक्क दाव्याचे अपील करणारे गरीब असल्यामुळे त्यांच्या पाठीमागे कोणतेही राजकीय पाठबळ नसून, नागपूर विभागीय आयुक्त यांनी ज्याप्रमाणे प्रलंबित वनहक्क दावे निकाली काढले. त्याचप्रमाणे अमरावती विभागातील सर्व दावे तातडीने निकाली काढून आदिवासींना न्याय मिळवून द्यावा. अशी विनंती सामाजिक कार्यकर्ते श्रीराम सातपुते यांनी अमरावती विभागीय आयुक्त यांच्याकडे एका निवेदनाद्वारे केली आहे.

## वासुंदे ग्रामपंचायतीच्या उपसरपंच पदी बाळासाहेब शिंदे;ग्रामस्थांच्या वतीने सत्कार



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१५, पारनेर (अहिल्यानगर) :** पारनेर तालुक्यातील वासुंदे ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी बाळासाहेब शिंदे यांची बिनविरोध निवड झाली आहे. उपसरपंच शंकर बर्वे यांनी राजीनामा दिल्याने रिक्त झालेल्या जागेवर शिंदे यांची निवड करण्यात आली. निवडीनंतर वासुंदे येथे आयोजित कार्यक्रमात नवनिर्वाचित उपसरपंच बाळासाहेब शिंदे यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष सुजित झावरे पाटील प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तर गावच्या सरपंच विमल झावरे, माजी सरपंच सुमन सैद, माजी उपसरपंच शंकर बर्वे, सूर्यभान भालेकर, वासुंदे सेवा सोसायटीचे चेअरमन नारायण झावरे, रामदास झावरे, विलास साठे, बापूसाहेब गायखे, भाऊ सैद, युवा नेते स्वप्निल झावरे, इंजि.निखिल दाते, अमोल साठे, पै. गणेश शिरतार, किरण पोपळघट, इंजि. प्रसाद झावरे, दिलीप पाटोळे, अमोल शिंदे, सुरेश शिंदे, दत्तात्रय गांगड, राजेंद्र शिंदे, गजानन जगदाळे, प्रणेश शिरतार, संतोष दाते, अमोल पोटघन, राजेश साठे, भाऊसाहेब जगदाळे, प्रल्हाद भालेकर, सुदाम शिर्के, सुभाष शिंदे, पोपट बर्वे, मच्छिंद्र झावरे, पोपट ठुबे, जनाबाई केदार, शांताराम साठे, बाळासाहेब झावरे, लक्ष्मण झावरे आदी मान्यवर उपस्थित होते.

निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून ग्रामसेवक भास्कर लोंढे यांनी काम पाहिले सत्कार समारंभात सुजितराव झावरे पाटील यांनी बाळासाहेब शिंदे यांचे अभिनंदन करत गावाच्या विकासासाठी एकजुटीने काम करण्याचे आवाहन केले. सरपंच विमल झावरे यांनीही शिंदे यांना शुभेच्छा देत गावाच्या प्रगतीसाठी सहकार्याचे आश्वासन दिले. बाळासाहेब शिंदे यांनी आपल्या मनोगतात सर्वांचे आभार मानत गावाच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध असल्याचे सांगितले.

# सततच्या वाहतूक कोंडीवर ठाणेकरांना मिळणार दिलासा...

## धुळ आणी ध्वनी प्रदूषणातूनही होणार मुक्तता...!

**अक्षराज : संजय पंडित**

**दि.१५, ठाणे :** ठाणे- बोरिवली मार्गावरील नवीन बोगदा मुल्लाबाग ऐवजी सत्यशंकरच्या भिंतीपर्यंत वाढवण्याचा निर्णय घेण्यात आल्याने येथील रहिवाशांनी समाधान व्यक्त केले आहे. वाहतूक कोंडी, धूळ आणि ध्वनी प्रदूषणाचा त्रास या निर्णयामुळे कमी होणार आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि खासदार नरेश म्हस्के यांनी हा प्रश्न मार्गी लावल्याबद्दल खासदार नरेश म्हस्के यांचे मुल्लाबाग येथील ठाणे-बोरिवली ट्विन टनल प्रकल्प बाधित पीपल असोसिएशन तर्फे आभार मानत सत्कार केला.



ठाणे- बोरिवली बोगदा प्रकल्पामुळे मुल्लाबाग येथील पाच इमारतींमध्ये राहणाऱ्या रहिवाशांना वाहतूक कोंडी, धूळ आणि ध्वनी प्रदूषणाचा त्रास होत होता. रहिवाशांनी येथील कामाला विरोध आंदोलन केले होते. या आंदोलनाची दखल घेत खासदार नरेश म्हस्के यांच्या पुढाकाराने रहिवासी आणि एमएम आरडीच्या अधिकाऱ्यांसमवेत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या प्रश्नावर सह्याद्री अतिथीगृहात मंगळवारी विशेष बैठक घेतली होती. बैठकीत मुल्लाबाग रहिवासी संघांच्या प्रतिनिधींचे म्हणणे ऐकून घेऊन त्यांची अडचण समजून घेण्यात आली. त्यानंतर त्यांच्या मागणीनुसार हा बोगदा मुल्लाबाग ऐवजी सत्यशंकरच्या भिंतीपर्यंत वाढवण्याचा निर्णय घेण्यात आला. तसेच या मार्गावर सध्या वाहतूक कोंडी आणि वायू प्रदूषणाचा त्रास कमी करण्यासाठी कन्व्हेयर बेल्टवरून नेण्यात येणारा राडारोडा आच्छादित करून त्यानंतर तो वाहून नेण्याचा निर्णय घेण्यात आला. भरगच्च भरलेल्या सभागृहात गेली अनेक दिवस आंदोलन करणाऱ्या रहिवाशांच्या चेहऱ्यावर समाधानाची भावना दिसत होती. आम्ही अडचणीत असताना नेहमीच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि खासदार नरेश म्हस्के हे आमच्या मदतीला धावून येतात. प्रश्न कोणताही असो ते नेहमीच योग्य आणि रहिवाशांच्या बाजूने तोडगा काढतात. विरोधी पक्षाच्या नेत्याने कितीही आवई उठवली, कितीही उर बडवून कामाचे श्रेय घेण्याचा प्रयत्न केला तरी येथील रहिवासी सुज्ञ आहे, अशी भावना यावेळी अनेक रहिवाशांनी व्यक्त केली. दरम्यान सत्काराला उत्तर देताना खासदार नरेश म्हस्के यांनी हे श्रेय आमचे नसून जनतेच्या रेट्याचे असल्याचे सांगत हा लढा येथील रहिवाशी जिंकले आहेत. रहिवाशांचे अभिनंदन करत आम्ही सदैव रहिवाशांसोबत असल्याची ग्वाही खासदार नरेश म्हस्के यांनी दिली.

नितीन लांडगे, आशुतोष सिरोलकर, राकेश मोदी, सिद्धार्थ पांडे, गौतम दिघे, केतन खेडेकर, जयंत धाणे, सुनील भिडे, प्रसन्न मुजमदार, मदुरेश सिंग, नितीन सिंग, शरद वारस्कर, दीपक पांडे, पल्लवी सेठ, तारक मोदी, निवृत्ती गावंडे, दीपक मल्होत्रा, टोनी सिंग, प्रल्हाद बोरसे, नीता कलोरे पल्लवी शेट्ये, कल्पना वोरा आणि रहिवाशांचे आंदोलन यशस्वी केल्याबद्दल खासदार नरेश म्हस्के यांनी जाहीर आभार मानले.

# बल्लारपूर पोलीस व स्थानिक गुन्हे शाखेची संयुक्त कारवाई

## ८०० पॉकेट प्रतिबंधित बीटी बियाणेसह दोन आरोपींना अटक

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१५, बल्लारपूर (चंद्रपूर) :** ८०० पॉकेट प्रतिबंधित बीटी बियाणे वाहतुक करणाऱ्या दोन आरोपींना अटक करत १३ लाख ५० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केले. सदर संयुक्त कारवाई स्थानिक गुन्हे शाखा, चंद्रपूर आणि बल्लारपूर पोलीसांनी १४ जुन रोजी केले. इमरान खान नासीर खान (३७) रा. बगड खिडकी वार्ड चंद्रपूर आणि माल मालक सुमित नगराळे रा. आष्टी ता. चामोर्शी जि. गडचिरोली असे आरोपींचे नाव आहे. दिनांक १४ जून २०२५ रोजी स्थानिक गुन्हे शाखा चंद्रपूर चे पथक पोलीस ठाणे बल्लारपूर हद्दीत पेट्रोलींग करीत असतांना मिळालेल्या गोपनिय माहितीचे आधारे पोलीस ठाणे बल्लारपूर चे पथकासह विसापूर-बल्लारपूर रोड वर सापळा रचुन चारचाकी वाहन टाटा एस क्रं एमएच ४० एबी २३५६ ला थांबवुन सदर वाहनांची पंचासमक्ष झडती घेतली असता त्यात एकुण ८०० नग पॉकेट चोर बीटी पुष्पा



५ नी संशोधित हायब्रीड कापूस बियाणे प्रति पॉकेट किंमत १ हजार ५००/- रु. प्रमाणे एकुण १२ लाख रुपयाचा माल अवैध रित्या मिळुन आल्याने सदर बियाणांची पडताळणी व कारवाई करणेसाठी कृषी विभागाला माहिती देवून कृषी विभागाचे अहवालावरुन वाहन चालक आरोपी इमरान खान नासीर खान (३७) रा. बगड खिडकी वार्ड चंद्रपूर आणि माल मालक सुमित नगराळे रा. आष्टी ता. चामोर्शी जि. गडचिरोली यांचेविरुध्द पोलीस स्टेशन बल्लारपूर येथे अपराध क्रमांक ४२१/२०२५ कलम २२३ भारतीय न्याय संहिता सहकलम १४, ७ (अ), ७ (क), ७ (ड), १९ बीज अधिनियम १९६६ व बियाणे नियंत्रक आदेश १९८३ चे कलम ३,८,१ तसेच बियाणे नियम १९६८ चे कलम ८,९,१०,११ पर्यावरण संरक्षण अधिनियम १९८६ चे कलम ८,१५, १५(१), (२),१६(१)(२) व अत्यावश्यक वस्तू अधिनियम १९५५ चे कलम ३ (२) (ड) ७ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असुन पुढील तपास बल्लारपूर पोलीस करीत आहेत.

सदरची कामगिरी पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन आणि अपर पोलीस अधीक्षक रिना जनबंधु, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अमोल काचोरे व बल्लारपूर पोलीस स्टेशन चे पोलीस निरीक्षक श्याम गव्हाणे यांचे नेतृत्वात सहायक पोलीस निरीक्षक दिपक कॉकेंडवार व स्थानिक गुन्हे शाखा चंद्रपूर व पोलीस ठाणे बल्लारपूर येथील अंमलदारांनी केली आहे.

## जिल्ह्याच्या सर्वांगिण विकासासाठी निधी कमी पडू देणार नाही - उपमुख्यमंत्री पवार

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१५, बुलडाणा :** राज्यातील सर्व जिल्ह्यांचा समतोल विकास साधण्यासाठी आवश्यक तेवढा निधी उपलब्ध करून दिला जात आहे. बुलढाणा जिल्ह्याच्या विकासासाठी निधी कमी पडू दिला जाणार नाही. विकासकामांसाठी शासन आवश्यक ते सर्व सहकार्य करेल, असे आश्वासन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले. यावेळी मदत व पुनर्वसन मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ना. मकरंद पाटील उपस्थित होते. खामगाव दौऱ्यात उपमुख्यमंत्री ना. पवार यांनी पत्रकार परिषदेत बोलताना जिल्ह्यातील विविध विकास प्रकल्पांचा व प्रलंबित कामांची माहिती घेतली. त्यांनी पुढे सांगितले की, ग्रामीण रस्ते, सिंचन सुविधा, आरोग्य सेवा, शिक्षण व इतर पायाभूत सुविधांसाठी राज्य सरकारकडून विशेष निधीची तरतूद केली जाईल. जिल्ह्यातील मागास भागांचा सर्वांगीण विकास, शेतकऱ्यांचे सक्षमीकरण आणि युवकांना रोजगाराच्या संधी निर्माण करणे, हे आम चे प्राधान्य आहे, असेही त्यांनी नमूद केले. राज्याचा आर्थिक विकास समतोल होण्यासाठी अर्थसंकल्पामध्ये सर्व विभागासाठी निधीची तरतुद करण्यात आली आहे. लाडकी बहिण व लाडका भाऊ योजनासाठी विशेष तरतुद करण्यात आली असून लाभार्थ्यांना लाभ दिल्या जात आहे. सोबतच इतर विभागावर निधीची कमतरता भासू देणार नाही,याची ग्वाही त्यांनी यावेळी दिली.